
# तुमची मशीन जाणून घ्या





या वीडियो मध्ये आपल्याला माहिती मिळेल, आपल्या शीलाई मशीनच्या मूलभूत गोष्टींची. एकदा तुम्हाला या गोष्टी कळल्या की मग तुम्ही तुमच्या शीलाई बरोबर वेगवेगळे प्रयोग करू शकतात.



सर्वात आधी तुम्हाला माहीत असावे ते म्हणजे सुई कशी बदलतात. हो, तुम्हाला सुया बदलत रहावया लागतील कारण, या खूप वेळी टिकत नाही, शिवाय तुम्हाला वेगवेगळ्या गोष्टींसाठी वेगवेगळ्या सुया लागतील. जरी तुम्ही अगदी साधी शिवन करत असाल, जेव्हा तुम्हाला दिसेल की नीडल रेषेच्या बाहेर जात आहे, तेव्हा तुम्ही नीडल बदला. सुई बदलायला या सोप्या पद्धतीचा वापर करा. सुईला घट्ट पकडणार्या क्लँपला डावीकडे फिरवून ढील करा, आता सुई यातून बाहेर काढा, तुम्हाला येथे एक सपाट आणि एक वर्तुळाकार सुई शँक दिसेल, सुईला परत लावण्यासाठी सुईला सावकाशपणे वरच्या बाजूला स्टॉपर पर्यंत लावा. सुइची सपाट बाजू नीडलबार कडे असावी, आता नीडल क्लँप स्क्रू घट्ट बंद करा म्हणजे सुई पडणार नाही.

आता तुम्ही शिकणार आहात की बॉबिन ला दोरा कसा गुंडालायचा, वेगवेगळ्या रंगांच्या कपड्यावर मॅचिंग धागा वापरात असताना हे फार महत्वाचा ठरेल, आता रीलहोल्डर ला वर खेचा, आणि त्यावर रील लावा. एक्सटेन्षन टेबल ला बाजूला करा, आता झाकण उघडा आणि बॉबिन केस ला शटल मधून बाहेर काढा. बॉबिन ला केस मधून बाहेर काढा, दोरा रील मधून ओढा, त्याला थ्रेड गाइड मधून पसार करा, दोराला बॉबिन च्या भोकातून बॉबिन च्या बाहेर च्या बाजूला काढा आणि बॉबिन भरा. आता बॉबिन ला बॉबिन विनडर स्पींडल मध्ये ठेवा. मोकळा धागा हा वरच्या बाजूला आला पाहिजे.






स्पींडल ला उजवया बाजूला ढकला. बॅलेन्स वील ला बाहेर ओढा म्हणजे धागा भरताना मशीन मोकळी होईल, आता बॉबिन चा धागा दाखवल्या प्रमाणे धरा, आणि फुट कंट्रोल ला दाबा म्हणजे मशीन सुरू होईल. काही गुंडाले मारल्यावर मशीन थांबवा, आणि बॉबिन वरचे धागे कापून टाका. मशीन तोपर्यंत चालवत राहा जोपर्यंत बॉबिन पूर्णपणे भरत नाही.
बॉबिन विनडर हा आपोआप थांबेल, आता धागा कापा, आणि बॉबिन होल्डर ला डावीकडे सरकावा. आता बॉबिन ला बॉबिन स्पूल मधून काढा. बॉबिन ला केस मध्ये ठेवा, आणि धागा अंटी क्लॉकवाइज़ आतमध्ये फिरला पाहिजे, धागा ओढून बघा की तो अंटी क्लॉकवाइज़ फिरत आहे का. आता बॉबिन केस धरा आणि त्याला बॉबिन केस च्या शटल असेंब्ली मध्ये टाका. शटल चे झाकण लावा, एक्सटेन्षन टेबल परत जागेवर ठेवा.



आता तुम्ही शिकाल की मशीन मध्ये धागा कसा टाकायचा ,बॅलेन्स वील ला आपल्याकडे फिरवून टेकउप लिवर ला जितका जाईल तितका वारपर्यंत न्या. मशीन वरच्या थ्रेड गाइड मधून धागा पसार करा पॉइण्ट वन कडे. घागा चक्रि जवळ पकडला असताना त्याला खाली पॉइण्ट २ कडे न्या आणि आरोझप्रमाणे यु टर्न घ्या.  आता धागा गच्च पकडून उजवीकडून डावीकडे वाळवा, टेकउप लिवर वरुन पॉइण्ट थ्री वर न्या. आणि टेकउप लिवर आइ मधून पॉइण्ट फोर वर काढा. आता धागा नीडल बार थ्रेड गाइड च्या मागून सरकावा, पॉइण्ट ५ वर.







सुई वर असली पाहिजे आणि नीडल थ्रेडर खाली ढकळला पाहिजे. धागा नीडल थ्रेडर मध्ये अडकावा म्हणजे सुई मध्ये धागा येईल. हे सर्व करायला थोडी प्रॅक्टिस लागते, म्हणून एक दोन दा प्रॅक्टिस करा. सुई चा धागा डाव्या हाताने अलगद पकडा आणि बॅलेन्स वील्स स्वता: कडे फिरवून सुई खाली नीडल प्लेट वर आणा. दाखवल्याप्रमाणे ओढून बॉबिन मधला धागा वर आणा. आता धागे एकत्र पकडून त्यांना प्रेसर फुट च्या खोऊन सरकावा.







मशीन ला एक जबरदस्त स्टारट देण्यापूर्वी एक शेवटची गोष्ट धागा किती ताणला आहे ते बघा. जर धागा सैल असेल, तर गुन्तु शकतो आणि जर जास्त कच्च असेल, तर वारंवार तूटू शकतो. थ्रेड टेन्षन डाइयल शून्य ते नौ पर्यंत अड्जस्ट होऊ शकते.  नौ वर जास्तीत जास्त टेन्षन मिळेल. कापड शिवताना थ्रेड टेन्षन तीन वर असलेला योग्य आहे.




आता तुमचा मशीन शिवायला अगदी तयार आहे. तुम्हाला फक्त पॅटर्न निवडायचा आहे, तुमच्या उषो जननी मध्ये बरेच पॅटर्न्स व बेल्ट आहेत, तुमच्या मॉडेल वर हे अवलंबुन आहे. तर जा, आणि निवडा. उदाहरणात जर तुम्हाला ज़िग ज़ॅग पॅटर्न शिवायची असेल ,तर पॅटर्न सेलेक्टर ला सी वर ठेवा, आणि स्टिच लेंघ डाइयल ला दोन वर ठेवा. तर आता एक कापड घ्या, आणि वेगवेगळ्या पॅटर्न्स आणि लेंत्स बरोबर एक्सपेरिमेंट करून परिणाम पहा. लवकरच तुम्ही शीलाई मध्ये एक्सपर्ट व्हाल.

